# महाराष्ट्रातील शेतीच्या अल्पउत्पादकतेची मिमांसा

**प्रा.डॉ.शिवप्रसाद पं.वायाळ** ,जनार्दन सुरुशे , **संशोधक विद्यार्थी, माधवनगर लाखाळा**
**ता.जि.** वाशिम संवाद ९४०५१८५८४०

.............................................................................................................

**प्रस्तावना:—**भारतीय अर्थव्यवस्था ही कृषीवर आधारीत आहे.स्वातंत्रयानंतर औद्यागीकीकरणावर भर दिला गेला मात्र कृषीमध्ये समाधानकारक परिवर्तन घडुन आणले गेले नाही.भारताच्या ३२.८७ कोटी हेक्टर भुभागापैकी १४.१ कोटी हेक्टर क्षेत्र निव्वळ लागवडीखाली असुन जवळपास ६० टक्के लोकसंख्या प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष पणे उपजिवीकेसाठी कृषी क्षेत्रावर अवलंबुन आहे.

सर्वसाधारणपणे पिके भाजीपाला पिकवणे इतकेच कृषीक्षेत्रामध्ये अभिप्रेत असते परंतु कृषी हा क्षेत्रासंबंधी संकुचित दृष्टीकोन झाला तर पिकांबरोबर चारा उत्पादन व गुरेढोर पालन पोषन याचाही कृषीमध्ये सहभाग होतो.दुध दुभते ,मास,शेळया ,बक—या पालन,कुक्कुटपालन,मासेमारी याचप्रमाणे महत्त्वपुर्ण आहे ज्याप्रमाणे तांदुळ , गहु,तेलबिया,कापुस,ज्युट,चहा,उस,बटाटे हे शेतीतील महत्त्वाचे उत्पादन आहे.

असे असताना आज शेती विविध प्रश्नांच्या कचाटयात अडकलेली दिसते.त्यांचा परिणाम शेती करणारा शेतकरी,उत्पादक,विविध कारणांनी दुर्लक्षित होवुन तो जणुकाही शेवटच्या घटका मोजत आहे असे वाटते.शेतक—यांच्या होणा—या आत्महत्या पाहल्या तर प्रत्येक संवेदनशील मनुष्य चिंतनशील बनत आहे.अशा शेतक—यांच्या पोशिंद्याच्या अवस्थेची कारणे शोधली तर त्यात अल्पउत्पादकता हा घटक महत्वाचा वाटतो त्याची कारणे खालीलप्रमाणे

**१.शेतीचा लहान आकार:—**

लोकसंख्येच्या वाढीबरोबर शेतीचा आकार कमी होत चाललेला आहे. शेतीचा आकार लहान झाल्यामुळे शेतक—यांना आधुनिक यंत्रसामुग्री व आधुनिक पध्दतीचा अवलंब करता येत नाही.लहान लहान शेताभोवती हद्द ठरविण्यासाठी बांध किंवा कुंपणे घातली जातात. त्यामुळेच बरीच जमिन वाया जाते.विखुरलेल्या शेतजमिनीच्या तुकडयांवर व्यक्तीगत लक्ष ठेवणे आर्थिकदृष्टया परवडत नाही त्यामुळे श्रम व वेळेचा अपव्यय होतो.इत्यादी कारणांमुळे शेतीचा लहान आकार असल्यामुळे शेतीची उत्पादकता कमी झाली आहे.

**२.निर्वाहासाठी शेती करण्याची वृत्ती:—**

राज्यातील बहुतांश शेतकरी स्वत:च्या अन्नधान्याची गरज भागविण्यासाठी शेतीमध्ये उत्पादन घेतात,शेती करुन नफा मिळवावा अशी त्यांची दृष्टी नसते. बहुसंख्य शेतकरी धान्याचे उत्पादन करतात आणि बाजारात फारशी विक्री करीत नाही.

**३.अपुरा भांडवल पुरवठा:—**

कृषी उत्पादन घेण्यासाठी व शेतीमध्ये सुधारणा करण्यासाठी भांडवलाची आवश्यकता असते परंतु शेतक—यांजवळ पुरेसे भांडवल असत नाही.बी—बीयाणे ,खते , औषधे ,तसेच नविन अवजारे खरेदी साठी कर्ज काढावे लागते.ग्रामीण भागामध्ये अजुनही मोठया प्रमाणात सावकारांकडुन शेतकरी कर्ज घेतात आणि त्यासाठी शेती गहाण म्हणुन ठेवली जाते.अशा परिस्थितीमध्ये उत्पादन क्षमता कमी होते.

**४.उत्पादनांसाठी आदानांचा अपुरा व अनियमित पुरवठा:—**

शेतीमध्ये उत्पादन वाढ घडवुन आणण्यासाठी उच्च प्रतिचे बियाणे ,खते,किटकनाशके यांचीगरज असते.या वस्तु बाजारामध्ये योग्य वेळी मिळणे गरजेचे असते.परंतु पुरवठा यंत्रणा अकार्यक्षम असल्यामुळे ते वेळेवर होत नाही परीणामी त्याचा परीणाम उत्पादकतेवर होतो.

**५.मान्सुनचा लहरीपणा:—**

राज्यातील शेती मान्सुनच्या पावसावर अवलंबुन आहे.पावसाचे अयोग्य वितरण,अपुरा पाउस,अतिपर्जन्य,गारांचा पाउस,दुष्काळ,उष्ण व थंड हवेच लाट इत्यादीचा परीणाम कृषी उत्पादनावर होतो.महाराष्ट्रात पाउस काही वेळा योग्य प्रमाणात तर काही वेळा कमी प्रमाणात पडत असल्याने उत्पादनामध्ये घट होते.

**६.जुनाट व अकार्यक्षम यंत्रे:—**

राज्यातील बहुतांश शेतक—यांची जमीन लहान आकाराची आहे.त्यांच वित्तीय साधने अपुरे पडतात.परिणामी शेतकरी शेती व्यवसाय जुनाट वअकार्यक्षम पध्दतीने करीत असल्याचे आढळते.सुधारीत बी—बियाणे ,खते,आधुनिक अवजारे व नविन प्रयोगात्मक शेती करणे त्यांच्या आवाक्याबाहेर असते.परिणामी उत्पादनात घट होते.

**७.विक्री व्यवस्थतेतील दोष व साठवणुकीच्या सोयींची कमतरता:—**

राज्यातील शेतक—यांच्या पिकाला योग्य भाव मिळत नाही.कारण राज्यातील कृषी उत्पादनाच्या विक्री व्यवस्थेमध्ये दोष आहे.काहीवेळा उत्पादन खर्चाएवढी जेमतेम किमत तर कधी त्यापेक्षा पण कमी किंमतीत शेतमालाची विक्री करावी लागते,कारण त्यांच्याकडे साठवणुकीच्या सोयीची व्यवस्था नसते.त्यामुळै त्यांची उत्पादनाची प्रेरणा नष्ट होते.

**८.ग्रामीण वातावरण:—**

ग्रमीण भागातील अज्ञान निरक्षरतारुढी व परंपरा अंधश्रध्दा इत्यादीमुळे उपलब्ध साधन सामुग्रीचा पुर्ण वापर करण्याची दृष्टी त्यांच्याकडे नसते.त्यामुळै शेती उत्पादनामध्ये घट होते.

**९.सिंचन सुविधांचा अभाव:—**

राज्यातील ब—याच भागामध्ये अपुरे पर्जन्य आणि मान्सुनचा अनिश्चितपणा याचा कृषी उत्पादनावर विपरीत परिणाम होतो.जलसिंचनाचा उपयोग जेथे पाण्याची टचाई आहे तेथेपाण्याचा पुरवठा करणे हा असतो मात्र ब—याच भागामध्ये सिंचनाच्या सोयी उपलब्ध नाहीत.

**१०.वाहतुकीच्या गैरसोयी:—**

राज्यातील अनेक भागातील शेतक—यांजवळ वाहतुक साधनांची उपलब्धता नाही.तेंव्हा शेतकरी स्थानिक व्यापा—यांनाच माल विकुन टाकतात.त्यामुळै शेतक—यांच्या कार्यक्षमतेवर विपरित परिणाम होवून कृषी उत्पादनाबाबत अनुत्साह निर्माण होतो.

थोडक्यात राज्यातील शेती मधील उत्पादनाची अशी विविध कारणे सां गता येतील. शेती उत्पादनामध्ये अमुलाग्र बदल आाणि उत्पादन वाढविण्यसाठी विविध उपाययोजना करणे गरजेचे आहे.